
ॐकार झांजे
द
र
ड
कोसळताना

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# दरड कोसळताना

लेखक : ओंकार अशोक झांजे

# दरड कोसळताना

## लेखक- ओंकार अशोक झांजे



पत्ता- मु पो बारसगाव ता महाड, जि रायगड महाराष्ट्र, 402 302

omkar.zanje1@gmail.com

7770099295

इंस्टाग्राम: kshitij_antariche, __omkar_zanje__

शिक्षण - पदविका: डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजीनियरिंग, लोणेरे

पदवी: ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी, पुणे

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com
www.esahity.in
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway, Thane.
www. esahity.com

**प्रकाशन : २० ऑगस्ट २०२१**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**नमस्कार, मी ओंकार अशोक झांजे**




कोकणातलं रायगड किल्याच्या सहवासात असलेलं महाड हे माझं गाव. (सध्या सारखं चर्चेत असल्याने तुम्ही खूप वेळा ऐकलं असेल) मी पुणे इथुन विद्युत अभियांत्रिकी पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. शाळेत असल्यापासून पुस्तकं वाचण्याची खूप आवड होती. तेव्हा वाचलेल्या पुस्तकांपैकी माझी आवडती पुस्तके म्हणजे रणजित देसाई यांचे श्रीमान योगी, वीणा गवाणकर यांनी अनुवादित केलेलं 'एक होता कार्व्हर', कलामांचं 'अग्निपंख' इ. पुढे डिप्लोमाला गेल्यापासून मराठी वाचन थांबलं. कारण अनेक इंजिनीयरिंग कॉलेजच्या लायब्ररीत मराठी (वाचण्याजोगी) पुस्तके नसतात. (हीच खंत) पुढे इंटरनेटवरून माझी ओळख ईसाहित्य प्रतिष्ठानशी झाली आणि पुन्हा एकदा मराठी वाचनाच्या प्रेमात बुडालो. मी पहिलं वाचलेलं ईबुक स्मिता पाटील यांचे 'कलाटणी' माझं अजूनही आवडतं पुस्तक आहे. माझ्या लेखनाबद्दल सांगायचं झालं तर लहानपणी छोट्या छोट्या काल्पनिक कथा लिहायचो. या शिवाय मला कविता लिहिण्याचा छंद आहे.

पण तेव्हा हे सगळे लिखाण कुठेच प्रकाशित केले नव्हते. द्वितिय वर्षाच्या इंजिनीयरिंगच्या परीक्षा झाल्यानंतर सहज डायरी लिहायला बसलो आणि मला ओम्लि २०५० ही कथा सुचली व मी ती पटकन लिहून काढली. मग टाईप करून माझ्या जवळच्या व्यक्तींना दाखवली व त्यांना ती खूप आवडली. ही कथा ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित करण्यात आली आणि तिला उदंड प्रतिसाद मिळाला. तिथुन पुढे मग मी कथा लिहिणे सुरु ठेवले. त्यानंतर पाहिले न मी तुला, मैत्री विजेशी भाग १ व २ प्रकाशित झाले. 'पाहिले न मी तुला' या २०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकाला वाचकांनी भरभरून प्रेम दिलं. लॉकडाऊनच्या काळातसुद्धा वाचकांचे मेल येत होते. अजूनही येत आहेत. आजवर ईसाहित्यवर माझी पाच पुस्तके प्रकाशित झाली. या सर्वच ईबुक्सना खुप चांगला प्रतिसाद मिळाला. 'दरड कोसळताना' हे माझे सहावे पुस्तक. ही कथा माझ्या खूप जवळची आहे. मी असे का म्हणतोय याचे कारण 'दोन शब्द' मध्ये मी लिहिले आहे.

ही कथा आपल्यापर्यंत पोहोचवल्याबद्दल ईसाहित्य प्रतिष्ठानचे आणि सुनील सामंत सर यांचे खूप खूप आभार. आणि सगळ्यात महत्त्वाचे ज्यांनी बालपणापासून माझ्यावर वाचनाचे संस्कार केले व माझे आयुष्य समृद्ध केले अशा माझ्या प्रिय आई

वडिलांचा मी सदैव ऋणी राहील. हे पुस्तक आपल्याला नक्कीच आपलेसे वाटेल अशी आशा करतो आणि आपली रजा घेतो.

आपल्या प्रतिक्रियांची वाट पाहत आहे...

ओंकार अशोक झांजे

सध्याचा पत्ता:

मु. पो बिरवाडी, ता. महाड, जि. रायगड, महाराष्ट्र

कायमचा पत्ता:

मु. पो. बारसगाव, ता. महाड, जि. रायगड, महाराष्ट्र

संपर्क: ७७७००९९२९५

ईमेल: omkar.zanje1@gmail.com

इंस्टाग्राम: kshitij_antariche, __omkar_zanje__

**दोन शब्द...**

काही घटना या मनाला अस्वस्थ करून जातात. चार वर्षांपूर्वी कोसळलेला सावित्रीवरचा पूल, गेल्या वर्षीचं निसर्ग आणि ह्या वर्षीचं तौक्ते चक्रीवादळ यांच्या जखमा अजून सुकल्या नाहीत तोच आणखी एक काळीज चिरणारी घटना घडली... तळीये गावात दरड कोसळून अनेक जण मृत्युमुखी पडले. जिथे कधीकाळी अख्खं गाव होतं, तिथं आता काहीच दिसत नाहीये... निसर्गसौंदर्याने नटलेल्या कोकणात अशा घटना वारंवार घडू लागल्यात... महापूर येतो आणि जातो; मात्र त्यानंतर अनेक प्रश्न उभे आ वासून उभे राहतात...

या व अशा काही घटना शब्दांत मांडण्याचा हा छोटासा प्रयत्न...

खरंतर ही कथा अंतराने माझ्या खूप जवळची आहे (दोन्ही अर्थाने). दरड कोसळलेले तळीये गाव हे माझ्या गावापासून अगदी चार किलोमीटर अंतरावर आहे. ह्या घटनेत आम्ही आमचे काही नातेवाईक गमावले. शिवाय आमच्या गावाला पुराचा खूप मोठा फटका बसला. २१ जुलै २०२१ रोजी मुसळधार पावसाला सुरुवात झाली. आणि सलग दोन दिवस अविरत पावसाने झोडपून काढलं. त्यामुळे आलेल्या पुराने सगळे जनजीवन विस्कळीत झाले. सलग

तीन आठवडे प्राथमिक सुविधा उपलब्ध नव्हत्या आणि त्यानंतर काही आठवडे सगळं पूर्वपदावर येऊ लागलं...(अजूनही सावरत आहे...) ज्यांचं आख्खं घर, कुटुंब गेलं त्यांचं काय झालं असेल कल्पनाही करवत नाही. माझ्या मते एखादा लेखक एखादी कथा लिहितो तेव्हा त्याने ते सगळे प्रसंग अनुभवलेच पाहिजेत असे नाही. प्रत्यक्ष अनुभवल्यावर लेखक शब्दांत ती कथा मांडू शकतो. मात्र जो इतरांच्या मनातल्या भावना आपल्या  समजून कागदावर मांडतो, तोच खरा लेखक असे मला वाटते.

या कथेत २२ जुलै २०२१ रोजी आलेल्या महापुरामुळे एक शहर, निमशहरी गाव, खेडेगाव आणि आदिवासी वस्ती अश्या चार वेगवेगळ्या आर्थिक आणि सामाजिक स्तर असलेल्या ठिकाणी एकाच वेळी घडलेल्या घटना चित्रित केल्या आहेत.

ही कथा सत्य घटनेवर आधारित असली तरी त्यातले प्रसंग आणि पात्रे काही अंशी काल्पनिक दाखवले आहेत. यामागे कथा अतिरंजित करण्याचा कोणताही प्रयत्न नसून, कथेला साजेसे वातावरण निर्माण करणे एवढेच आहे. नाण्याला दोन बाजू असतात तशीच कोणत्याही गोष्टीला चांगली आणि वाईट बाजू असते. महापुरात मदत करणारेही असतात आणि आपले घर भरणारेही असतात.  ह्या कथेतील प्रसंग अशाच काही चांगल्या वाईट

घटनांचे द्योतक आहे. ही गोष्ट सर्वसमावेशक आहे असं मी मुळीच म्हणणार नाही. मात्र या कथेतील एखादा छोटासा प्रसंग जरी तुम्हाला त्या ठिकाणी घेऊन गेला तर त्यात मी स्वतःला धन्य समजेन. तेव्हा सर्व वाचक मायबाप या कथेला उत्तम प्रतिसाद द्याल अशी आशा करतो...

- ओंकार सुनिता अशोक झांजे

## होत्याचं नव्हतं झालं...

## 'दरड कोसळताना'

ओंकार सुनिता अशोक झांजे

या कथेचे लेखक स्वतः या संकटाचे साक्षीदार आहेत. यातील अनेक घटना त्यांनी पाहिल्या वा अनुभवल्या तर काही प्रत्यक्षदर्शींकडून ऐकल्या. यात काही भाग काल्पनिक व काही नावे बदलली आहेत. नववं न्यूज अँकरचं प्रकरण आणि कथेचा शेवट (फौजीचा प्रसंग) हे प्रसंग काल्पनिक आहेत. यातून कोणालाही दुखावण्याचा उद्देश नाही. कथा नाट्यपुर्ण व्हावी यासाठी काहीही केलेले नाही.

# अर्पणपत्रिका

२२ जुलै २०२१ रोजी

तळीये गावात दरड कोसळून

मृत पावलेल्या सर्व निष्पाप जीवांना

हे सहावे पुष्प अर्पण

प्रकरण


१ रोजचंच मरण

२ धोक्याची चाहूल

३ एकादस

४ किती सांगायचंय मला

५ सर आली धावून

६ दरड कोसळताना

७ डोळ्यांदेखत

८ देवा तू सांग ना, कुठे गेलास हरवुनी?

९ जो दिखता है, वो बिकता है

१० अफवांचा पाऊस

११ कुणी मदत देतं का मदत?

१२ एकमेका सहाय्य करू

१३ दरड कोसळल्यावर

# दरड कोसळताना

## सत्य घटनेवर आधारित

## १३ प्रकरणांची लघुकथा

## प्रकरण १

## रोजचंच मरण

### दि २० जुलै २०२१ स्थळ: आदिवासीवाडी, काळीज

सकाळचे नऊ वाजले असतील. 'ती' झोपड्यातून बाहेर पडली. माथ्यावर ऊन होतं. कोकणातला जुलै असला तरी सूर्य आग ओकत होता. अशातच ती आणि तिच्या सोबतीच्या निघाल्या बिरवाडीच्या दिशेने... सावळी कांती, तुकतुकीत चेहरा, कडका देह त्यावर जुनाट लुगडं आणि कंबरेला चार महिन्यांचं शेम्बडं पोर

. नाव? नाव कशाला विचारता? ज्यांचं अस्तित्वच समाज मान्य करत नाही त्यांचं नाव जाणून घ्यायची कोणाची इच्छा! अर्धा तासभर चालून चौघींनी जवळचं गाव गाठलं, कुठेतरी काम मिळेल या आशेने. दिवसाची सुरुवात काहीतरी खाऊन करावी म्हणून चहा प्यायचं ठरवलं. कुमुदच्या दुकानासमोर येऊन त्यातला एकीने विचारलं, "चाय हाये काय?"

"हो, हाय" कुमुदने तिरपा कटाक्ष टाकत तुसडेपणाने उत्तर दिलं.

उत्तर ऐकू न आल्याने तिने पुन्हा विचारलं "आं??"

त्यावर कुमुद भडकली, "ऐकू नाय येत येकदा? नाय भेटनार हिकडं, फुडं जा!!"

बस्स एवढच कारण पुरेसं होत त्यांना हाकलण्यासाठी. वर उन्हाचा अंगाला बसणारा चटका आणि चायवालीच्या शब्दांचा काळजावर चटका बसत होता. मात्र या दोघांची तिला सवय झाली होती. आधीच त्या कुठल्यातरी रोगामुळे कामं मिळेनाशी झाली होती. तिच्या जगण्यात काडीमात्र फरक पडला नव्हता.

"गाडीवाला आया घर से कचरा निकाल" बाजूने कचरा गाडीचा आवाज आला. सगळ्या लोकांनी कचरा टाकायला गर्दी केली. क्षणभरासाठी 'ति'ला वाटलं या लोकांसाठी या कचरागाडीला पण किंमत आहे!

## प्रकरण २:

## धोक्याची चाहूल

### दि २० जुलै २०२१ स्थळ: महाड शहर

"काय काका, आज उशीर?" समोरच्या फळवाल्या दुकानदार अब्दुलने विचारलं.

"हो जरा उशीरच झाला" दुकान उघडत पारेखकाका उत्तरले

अब्दुल: लय ऊन हाये आज

पारेखकाका: हो ना! जुलै महिना म्हणून वाटतच नाय. महाडला पूर आल्याशिवाय पावसाळा असल्यासारखा वाटतच नाय. तशी सवयच झाले म्हणा...

अब्दुल: आज सकाळी टीव्हीला दाखवत होते की कोकणात अतिवृष्टीचा अंदाज आहे म्हणून चार दिवस!

पारेखकाका: अंदाज ना? मागच्या वेळेस पण नाय का दिला होता. चटक ऊन पडलं होतं आणि आलाच तर घ्यायची बांधाबांध करायला

होना! अब्दुलने दुजोरा दिला.

तिकडे दुसऱ्या मजल्यावर वडके आजी आपल्या नातवासोबत गच्चीत बसल्या होत्या. पार्थचा ऑनलाईन अभ्यास सुरू होता.

पार्थ: आजी महाबळेश्वरला खूप पाऊस पडला का आपल्याकडे पूर येतो ना?

आजी: हो, म्हणजे असं म्हणता येईल. आमच्या काळी पुराणातली एक गोष्ट सांगायचे. महाबळेश्वर राजाला पाच मुली होत्या- कृष्णा, कोयना, वेण्णा, पंचगंगा आणि सावित्री. त्यापैकी चौघींचं लग्न घाटावर लावून दिलं आणि सावित्रीला एकटीला कोकणात दिली.

पार्थ: इंटरेस्टिंग आहे! आजे तुमच्या वेळी कसा यायचा पूर?

आजी: यायचा ना पण जास्तीत जास्त दुसऱ्या मजल्यावर. पण त्याकाळी सगळीकडे इमारती पण नव्हत्या.

"म्हणजे आपण तरी सेफ आहोत" पार्थने निर्वाळा दिला.

इकडे खाली अब्दुल आणि पारेखकाका तडकाफडकी दुकानाबाहेर आले. मगाशी पांढरेशुभ्र दिसणारं आभाळ आता काळवंडलं होतं. जणू काही रात्रीचे आठ वाजलेत इतका काळोख सकाळी दहा वाजता दाटला होता.

अब्दुल: घ्या, आला पाऊस!

पारेखकाका: कुणास ठाऊक अनामिक भीती वाटते रे. लय वर्षांपूर्वी सव्वीस जुलैला दरडी कोसळल्या. चार वर्षांपूर्वी सावित्रीवरचा पूल कोसळला. गेल्या वर्षी तारिक गार्डन बिल्डिंग कोसळली. गेल्या वर्षी निसर्ग ह्या वर्षी तौतके का तौकते चक्रीवादळ. आपल्या कोकणाला कुणाची नजर लागले काय माहीत!

हा पाऊस पण कायतरी घेऊन नाय ना जायचा?

## प्रकरण ३

## एकादस

## दि.२१ जुलै २०२१ स्थळ: बिरवाडी

"हे बघ मम्मे, ह्या वर्षी अशी पालखी गेले पंढरपूरला" शिवशाही एसटीचा व्हाट्सएपला टाकलेला स्टेटस दाखवत राहुल आईला म्हणाला.

"त काय, गेल्या वर्षी पन नाय झाली ना वारी. कधी जायचा हा करोना" आई हताश होत म्हणाली.

"ठेव आता मोबाईल चार्जिंग नको संपवू, लाईट गेले पहाटेच. पाऊस पन लय पडतोय. लवकर नाय यायची"

राहुल मोबाईल ठेवून अंगणात आला. सकाळपासून मुसळधार पाऊस कोसळत होता. अगदी एक सेकंदसुध्दा थांबला नव्हता. परत मोबाईल वाजला. ईद मुबारक मेसेज केलेल्या मित्राचा थँक्स म्हणून रिप्लाय आला होता. शाळेच्या ग्रुपवर वेगवेगळे व्हिडीओ आले होते. गावात पुराचं पाणी शिरू लागलं होतं आणि जवळच्या काळ नदीचं पाणी पुलाला टेकायचं बाकी होत.

समोरच्या कांबळे काकांनी दुकान लवकर बंद केलं. हळूहळू रस्ते सामसूम होऊ लागले. मोबाईलची रेंज गेली. राहुलने सगळे मोबाईल चेक केले. सर्वांचीच रेंज गेली होती. काही काम नाही म्हणून सहज त्याने घरात पडलेलं जुनं पुस्तक वाचायला घेतलं...

गोष्ट संपत आली होती...

'एखाद्या मेलेल्या माणसाचं अंतिम संस्कार केलं नाही किंवा त्याची शेवटची ईच्छा पूर्ण करायची राहिली असेल, जीव कशात तरी अडकला असेल तर मेल्यानंतर त्याचा आत्मा अतृप्त राहतो...'

"हं.. काहीही..." पुस्तक बंद करत मनातल्या मनात हसत राहुल स्वतःशीच बोलला.

पाऊस काही थांबायचे नाव घेत नव्हता. हिरवी शाल पांघरलेल्या त्या डोंगराळ भूमीत सर्वत्र काळोखाचं सावट पसरलं होतं. तिकडे दुरवर महाबळेश्वरला भारतातलं सर्वाधिक पाऊस पडलेलं ठिकाण बनवण्याचं प्रयोजन वरुणदेव करत होते...

## प्रकरण ४

## किती सांगायचंय मला

## दि. २१ जुलै २०२१ स्थळ: लडाख

आर्मीच्या बेस कॅम्पमध्ये असलेला रणजित बराच वेळ आपल्या मोबाईलचं वॉलपेपर न्याहाळत बसला होता. ते होतंच इतकं सुंदर ! त्याचं गाव! सह्याद्रीच्या कुशीत, पुणे आणि रायगड जिल्ह्याला जोडणाऱ्या वरंध घाटापासून काही अंतरावर उंचावर त्याचं टुमदार गाव वसलं होतं. त्यांच्याकडे सगळी गावं एकतर डोंगरावर किंवा मग डोंगराच्या पायथ्याशी वसलेली होती. त्याच्या गावाला लागून सुद्धा डोंगराचा एक भलामोठा उंच कडा होता. आणि त्याच्या टोकावर त्यांच्या ग्रामदेवतेचं- जननी मातेचं मंदिर होतं. शिवरायांच्या काळात हाच पर्वत टेहळणीसाठी वापरत असत. त्यामुळे त्याचं नावही 'जननीदुर्ग' असं पडलं होतं. याच देवळातून दूरवर किल्ले रायगड, राजगड, मंगळगड न्याहाळता येत असत. आणि खाली पाहिल्यावर धुक्यात हरवलेली तालुक्यातील इवली इवली गांव नजरेस पडत. दरवर्षी गावकरी वर्षातून एकदा या देवीची अन दुर्गाची मनोभावे पूजा करत. हा अजस्त्र पर्वत जणू त्याचा रक्षणकर्ताच होता. बघता बघता रणजित बालपणीच्या

आठवणींत हरवून गेला. तो भानावर आला ते फोनच्या आवाजामुळे. गावावरून बायकोचा फोन आला होता. त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य पसरले. मग बराच वेळ दोघांनी गप्पा मारल्या.

स्मिता: गेल्या वर्षी लॉकडाऊन संपल्यावर आला होतात. एक वर्ष होईल आता. कधी भेटणार सुट्टी?

रणजित: भेटल, येईन लवकरच

त्यानंतर घरच्यांशी बोलणं झालं. आईने फोन ठेवताना बोललेली वाक्यं अजून कानात तशीच होती-

"बाला, गेल्या वर्षी पन नव्हता आलास ना पुंजेला. आंदा बघ सुटी मिलते काय. बारक्याचा नवस हाये. मांगं शिक होता तवा बोललो होतो"

"हो, आई. बघू आता कसं काय होतंय ते"

घरची खुशाली विचारून त्याने फोन ठेवला.

रणजितने कॅम्पमधून बाहेर डोकावलं. रात्रीच्या लख्ख चांदण्यात हिमालय पर्वताचा कडा जणू चांदीसारखा चकाकत होता. पण तरीदेखील आज त्याला त्याच्या गावच्या दुर्गापुढे तो फिका भासत होता. घरची आठवण आली आणि डोळ्यात टचकन पाणी आलं...

## प्रकरण ५

## सर आली धावून

### दि. २२ जुलै २०२१ स्थळ: सह्याद्री पर्वतरांग

"जा... तुझी सागराला मिळण्याची इच्छा पूर्ण कर... आणखी फार काळ मी तुला अडवू शकत नाही" वरुण राजाने सह्याद्रीत उगम पावलेल्या झऱ्याला आदेश दिला. कान बधिर करणारा वारा घोंगावू लागला. आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली. समुद्राला भेटण्याच्या ओढीने नदी त्वेषाने वाहू लागली. उद्या पौर्णिमेचा दिवस होता. दर्याला उधाण आलं होतं जणू तो आसुसलेला होता तिच्या भेटीसाठी.

महाबळेश्वरातून सावित्रीने वेगाने उडी मारली आणि ती धावत निघाली... इकडे पर्वतराजीत उगम पावलेल्या सर्वच नद्या प्रवाह वाढवू लागल्या... रायगडच्या दुर्गम खोऱ्यातून काळ नदीसुद्धा वाट काढत निघाली... परशुरामांच्या भूमीत दिवसाढवळ्या अंधाराचं साम्राज्य पसरलं होतं. एक एक गाव, एक एक डोंगर उलटत त्या जणू मोठा पल्ला गाठत होत्या. काळ नदीला दूरवरून त्या मंदिराचा कळस दिसला. अरे देवा... तिच्या लक्षात आलं की हे आपल्याच

किनाऱ्यावर बांधलेलं मंदिर आहे पण आता पर्याय नव्हता. सगळं ओलांडून जाणं भाग होतं. काळीज गावात काळ नदीच्या तीरावर वसलेलं काळीश्री नदीचं मंदिर पूर्ण बुडालं... तशीच ती पुढे निघाली... बिरवाडी गावाच्या दिशेने...

इकडे वशिष्ठी नदीने चिपळूनात हाहाकार माजवला. सावित्री महाड शहराच्या उंबरठ्यावर येऊन पोचली. अरेरे पण हे काय... तिला फार वर्षांपूर्वीचं ते रूप दिसलंच नाही. जिकडेतिकडे तिची अडवणूक केली गेली. तिचं पात्र, तिचा किनारा सगळीकडे उंच उंच इमारती, बांधकामं यांनी वेढला होता. अक्षरशः तिच्या अंगावर कचरा टाकला होता... तिला फार वाईट वाटले. पण काहीही करून तिला मार्गस्थ होणे भाग होते. माझी वाट या लोकांनी अडवली. माझा श्वास कोंडतोय... म्हणत रागाने लालबुंद झाली... तशीच लालभडक ती वाट दिसेल तिकडे घुसू लागली. पूल तुटले, रस्ते खचले पण ती चवताळून उठली होती. लोकांच्या किंकाळया, त्यांचे उध्वस्त झालेले संसार या कशाचेही भान तिला राहिले नाही.

जवळजवळ सगळीकडे सारखीच परिस्थिती होती. धापा टाकत कशीतरी ती त्या दलदलीतून सुटली. पण तिच्या सर्वांगावर कचरा, चिखल लेबडला होता. वरूण राजाही धो धो कोसळून तिला साथ देत होता. खूप मोठा आकांडतांडव करून ती

सरतेशेवटी समुद्राच्या जवळ आली. अरबी सागराने उंचच उंच लाटा फेकत जणू तिला आलिंगन दिले. अखेर त्यांची भेट झाली होती. नदी आता तृप्त झाली होती... मात्र इकडे मनुष्याची काय अवस्था झाली असेल तिने क्षणभरही विचार केला नाही.

काळोख्या त्या रात्री आकाशी चंद्र उगवला असताना वरुण राजाने पाऊस बरसणं थांबवलं आणि चोहीकडे शांतता पसरली... जीवघेणी शांतता...

## प्रकरण ६

## दरड कोसळताना

### दि. २२ जुलै २०२१ स्थळ: दरडग्रस्त गाव

आज दुसरा दिवस... पाऊस अजूनही भयंकर कोसळत होता. कालपासून पावसाला अजिबात अंतारा नव्हता. त्यात परवापासून लाईट नसल्याने दैनंदिनी अडखळल्यागत झाली होती. पडाळकर कुटुंबाने आपले दुपारचे जेवण संपवले. सगळयांच्याच चेहऱ्यावर चिंता उमटली होती. कारण मुसळधार पावसाची सवय तर होती पण हा असा राक्षसी पाऊस उभ्या जन्मात बघितला नव्हता. तो पडतच होता... अविरत...

सुधीरने घड्याळात टाइम बघितला. दुपारचे दोन वाजले होते. आज सेकंड शिफ्ट असल्याने कामावर जायची तयारी करू लागला.

वर्षा: आहो, सवकिस जा हं... लय पाऊस हाये. मोबाईल न्हेताईव काय? रेंज असली त बघा एमआयडीसीत...

पुढे काय होणार याची किंचितही कल्पना नसलेल्या वर्षाने नवऱ्याला डब्बा दिला. आपल्या सहा महिन्यांच्या झोपलेल्या बाळाची हळूच जाऊन पप्पी घ्यावी या विचाराने सुधीरची पावले पाळण्याकडे वळली पण तो झोपेतून उठेल म्हणून त्याने पाऊल मागे घेतले. खरंतर या मुसळधार पावसातून कामावर जायचं त्याच्याही जीवावर आलं होतं पण काम ते काम! बाहेर सुटलेल्या जीवघेण्या वादळाने पाठीमागचं दार धडाधड वाजत होतं. त्या आवाजाने झोपलेला वीर ही अधूनमधून दचकत होता. सुधीरने वर्षाकडे क्षणभर पाहिलं. कदाचित ही त्यांची शेवटची भेट होती... या जन्मातली... सुधीर कामावर गेला. पण वर्षाचं चित्त थाऱ्यावर नव्हतं. बाहेर इतकं विचित्र वातावरण असताना कुठे काही अशुभ तर होणार नाही ना या विचाराने काळजाचा थरकाप उडत होता...

याच विचारात ती डोळे उघडे ठेवून बेडवर पहुडली. अर्धा तासच उलटला असेल कसल्याशा आवाजेने ती जागी झाली...

सहा महिन्यांचा वीर झोपेतून उठला होता आणि रडत होता. वर्षाने त्याला पाळण्यातून बाहेर काढले आणि आणि दूध पाजले. त्याला कुशीत घेऊन थोपटताना तिला कधी डोळा लागला कळलंच नाही.

"वैनी दार उघडा... वसरं आलय वसरं..."

कुणीतरी मागचा दरवाजा ठोकवत जोरजोरात बोंबलत होतं. त्याच आवाजाने अर्धवट निद्रेत असलेल्या वर्षाचे डोळे उचकटले. बाहेर कान बधिर करणारा पावसाचा आवाज होताच पण पुढचं दार लावून घेतल्यानं तो जरा कमी झाला होता. काय झालं बघायला तिने मागचा दरवाजा उघडला...

ईशानी: वैनी, आहो वसरं आलंय पाटी... चला लवकर... सगली जमलेत तिकडं...

वर्षाचा अंगावर काटा आला. पुढे काही भयंकर घडलं तर?? हे पण कामावर गेलेत आणि ह्याला घेऊन कुठं जायचं?? क्षणभर विचारात हरवली असताना ईशानी पुन्हा ओरडली..

"ओ वैनी चला..."

वर्षाने घर बंद करायला घेतलं...

ड्यूटीवर असलेल्या रणजितचा फोन वाजला...

स्मिता: आहो काय करताय... ऐका पाटी वसरं आलंय जरासं... सगळी लोकं पळताईत...

रणजित: अगं सकाळपासना फोन लावतोय. कुणाचाच फोन लागत नाय. नक्की काय होतंय. घाबरू नका... ह... हेलो... आवाज कट होतोय

स्मिता: हा ते रेंज नाय ओ... जिओला हाये फक्त एक कांडी...

टिंग.......

फोन कट झाला... रणजितने बायकोला आणि बाकीच्यांना फोन लावून बघितला पण कुणाचाही फोन लागत नव्हता.तो थोडा चिंतातुर झाला कारण अशी परिस्थिती त्याने आधी कधीच अनुभवली नव्हती.

गायकवाड काकांनी तडक आपली मिनिडोअर काढली. बाहेर येऊन दुर्गाकडे पाहिलं. वरून छोटेमोठे दगड धोंडे आणि माती वाहून खाली येत होती. कदाचित हीच धोक्याची घंटा असावी त्यांनी मनोमन ताडले. लागलीच घरच्यांना गाडीत कोंबले. जाताना गावकऱ्यांना आवाज दिला-

"कोण येतंय काय? जागा हाये विक्रममदी. खाली चाललोय पठारला. कुणी थांबू नका हितं, मोठं वसरंबिसरं यायचं, हे कायतरी इपरित दिसतंय"

कान बधिर करणाऱ्या पावसात गायकवाड काका ओरडत होते. एक दोघे त्यांच्यासोबत आले आणि ते निघाले...

दोघेतिघे चटकन बाईकवर बसून खालच्या गावात पळाले तर काही म्हातारीकोतारी अजूनपण घरातलं सामान, पैसा अमका तमका यांची बांधाबांध करीत होते. काहीतरी वेगळं घडतंय असा

प्रत्येकाला धोका जाणवू लागला होता. पण या भयाण पावसात नक्की कुठं जायचं हेच कळत नव्हतं.

एक तास उलटला...

"काय झालंय मेला वशेडा आजाबात उघडतच नाय त"

"व्हव, कुणाची नंदार लागली काय म्हायती"

"पांडुरंगा... वाचव रे"

गावातल्या एका मांडवाखाली जमलेल्या काही लोकांपैकी खाली फतकल मारून बसलेल्या साठ वर्षाच्या दोन म्हाताऱ्या गाऱ्हाणं गात होत्या. दहा वर्षाच्या ईशानीने डोंगरावरच्या देवीला हात जोडायला मान वर केली तोच तिची नजर भीतीने विस्फारली गेली. जणूकाही पाताळाहुन भयंकर काहीतरी तिने पाहिलं असावं. आसमंतात विजांचा कडकडाट चालू होता, गुरं जिवाच्या आकांताने ओरडत होती. तोच काळीज चिरणारा मोठा आवाज झाला. डोंगराचा अर्ध्यापासून खालचा कडा स्वप्नवत वाटावा तसा कोसळला आणि सुरू झालं मृत्यूचक्र... किंकाळयांच्या आवाजानं गाव हादरलं. चिखल, भलेमोठे दगड, पाणी यांचा अखंड प्रवाह अंगावर येताना विचार करायला सेकंदभरही कुणाला मिळाला नाही. आधाराशिवाय उभं असलेलं कुणीतरी त्याच वेगात वाहून

गेलं तर आडोश्याला धरून बसलेलं कुणी आतल्या आत जमिनीत खचत चाललं होतं.

ईशानीची आई सुदैवाने एका बाजूला असल्याने शक्य तितका जोर लावून तिने ईशानीला आणि शुभमला त्यातून ओढले.

"वाचवा, वाचवा" पलीकडून लोकांचे आक्रोश कान चिरत होते. गावातली सगळी घरं पत्त्यांचा बंगला कोसळावा तशी जमीनदोस्त झाली. अन काही जीवांचे आवाज आतच दाबले गेले. वरून पावसाचा मारा सुरूच होता. त्यात डोंगरातून वाहून आलेलं वसरं म्हणजे दरड गावाला खाली गाडत होती. दूरवरून बाजूच्या आवाडातली काही लोकं हा सगळा थरार पाहत होती पण हे असं दृश्य बघताना जो तो जागीच गोठला... त्यात वाचवायचे भान कुणाला राहणार?

"वाचवा रं, कुनीतरी वाचवा रं मना..." जिवाच्या आकांताने नर्मदा आजी ओरडत होती. तिचे दोन्ही पाय ढिगाऱ्यात अडकले होते आणि वरून तो प्रचंड लोट फटकारे मारत होता.

"आये, ती बुद्धावड्यातली रेखा बघ..." ईशानी.

"पल तू आंदी, सगलीच घवलीत त्यात" शुभम.

ईशानीच्या आईला मात्र आपला जीव कसा वाचवायचा हेच कळत नव्हतं. ढिगाऱ्यातून कसेबसे बाहेर पडले ते गावाच्या दुसऱ्या बाजूला आणि तिकडे रस्ता संपून घनघोर जंगल सुरू होत होतं. गावातली दुसरी आवाडं पाण्याच्या त्या बाजूला होती. नजर भिरभिर फिरत होती. तोच पुन्हा दुसरीकडून पाण्याचा एक जबरदस्त लोंढा आला आणि दहा वर्षाची ईशानी गपकन तीन फूट खाली गेली. बाजूला असणारा विजेचा खांब तिच्यावर पडता पडता राहिला. तिला वाचवण्यासाठी आलेली आई पण वायरिंमध्ये गुंतू लागली. या काही सेकंदात फक्त डोकं बाहेर असलेल्या ईशानीने उघड्या डोळ्यांनी सगळं काही वाहून जाताना बघीतलं. लोकांची घरं, वाड्यातली गुरं, टीव्ही, फ्रिज, कपाट, पेट्या सगळं वाहून गेलं होतं. तिचे दात ओठ थरथरत होते. मरण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली असताना जगायची सारी आशा विरत चालली होती.

इकडे सगळी यंत्रणा ठप्प झाल्याने आजूबाजूची दोनतीन गावे सोडली तर कुणालाच या प्रलयाची कल्पना नव्हती. बुडत्याला काडीचा आधार भेटावा तसा एकाच सिमकार्ड कंपनीला किंचित रेंज होती. खालच्या गावच्या पाटलांनी थेट दुसऱ्या तालुक्यातील ओळखीच्या साहेबांना फोन केला-

"माझी आख्खी सासुरवाडी गेले.  वसरं आलंय वसरं..."

इकडची भाषा कळत नसल्याने पलीकडून फोनवर बोलणाऱ्या श्री इंगोले साहेबाना काही वेळ काय झालंय ते कळलंच नाही. थोडया वेळाने उलगडा झाला आणि त्यांनी तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयात संपर्क साधला. कुठेतरी बातमी पोचली होती...

प्रचंड वेगाने फेकले गेल्याने दोन किलोमीटर अंतरावर गावाखालच्या दरीत चिखल, दगडधोंडे, घराच्या भिंती यात अडकून पडेलला राकेश मदतीची वाट पाहत होता. कुणीही येणार नाही हे माहीत असून कुणीतरी येईल या खोट्या आशेवर तो जिवंत होता. डोळ्यासमोर आयुष्याची सगळी कमाई वाहून जाताना बघून अश्रूंचा बांध फुटला होता. मात्र क्रूर पावसाने तोही दिसणार नाही अशी व्यवस्था केली होती. काळवेळेच भान उरलं नव्हतं. रात्री कधीतरी पाऊस पूर्ण थांबला. आणि सर्वत्र भयाण शांतता पसरली. खालच्या ढिगाऱ्यात त्याला नकोनको ते दिसत होते. तोच त्याची नजर तिकडे गेली. झाडांच्या तुटलेल्या फांदीवर एक सहा महिन्यांचं बाळ डोळे मिटून अगदी शांत झोपलं होतं... बहुतेक कायमचं...

## प्रकरण ७

## डोळ्यांदेखत

### दि. २२ जुलै २०२१ स्थळ: आदिवासीवाडी, काळीज

"ए सोरा.. हुई.." 'ती'ने आपल्या मुलाला ओरडत मागे यायला सांगितलं.

दूरवर एका बाजूला असलेल्या त्यांच्या वाडीतून समोर अख्खं गाव पुराने वेढलेलं दिसत होतं. दोन दिवस झाले ती आणि तिच्या वाडीतली लोकं झोपड्यातच होती. कुठनही बाहेर पडायला जागा नव्हती. जिकडेतिकडे पाणीच पाणी! घरात खायला अन्न नव्हतं आणि वरून छपरातून पाणी गळत होतं. त्यामुळे आत बाहेर सारखीच परिस्थिती झाली होती. झोपडीतलं पाणी वाढू लागलं तसं सगळ्यांनी पाठीमागची टेकडी गाठली. डोक्यावर छत्री नव्हती त्यामुळे भेटेल ते डोक्यावर घेऊन या मुसळधार पावसापासून वाचण्यासाठी संघर्ष सुरू होता. वरून सगळीकडे दिसत होतं ते फक्त आणि फक्त पाणी! या पुराने गरीब आणि श्रीमंत साऱ्यांनाच सारखं लुटलंय याची कदाचित तिला कल्पना नसावी.

रात्री पाऊस कमी झाला आणि पुराचं पाणी ओसरू लागलं. सगळेजण आपापल्या झोपड्यात परतू लागले. मात्र आत काहीच शिल्लक नव्हतं. फाटलेल्या कपड्याला ठिगळ लावल्यावर नेमकं तेच फाटावे अशी तिची गत झाली. दूरवर रस्त्यावर कुणीतरी तरुण वेड्यासारखा धावताना दिसत होता. 'ती' पुन्हा आत आली. आज ती उपाशीपोटीच झोपली.

सुधीर वेड्यासारखा जिवाच्या आकांताने धावत होता. त्याची सेकंड शिफ्ट संपायला वेळ असला तरी गावात दरड कोसळल्याची बातमी कळली आणि तो वेड्यासारखा पिसाळला. तडक बाईक घेऊन तो घराकडे निघाला. पुराचं पाणी कुठे कमी कुठे जास्त होतं. पुढे मात्र नदीवरचा पुलच वाहून गेला होता. त्याचं मनोबल खचलं पण पुन्हा गाडी वळवून खालच्या बाजूने धरणाकडे तो गेला. दुर्दैवाने तोही वाहून गेला होता. इतका अगतिक होताना त्याची अवस्था काय झाली असेल कल्पनाही करवत नाही. मग पुन्हा त्याने एक तासाचा वळसा घालून वेगळ्या रस्त्याने जायचं ठरवलं. पुढे काही अंतर पार केला आणि अजून एक ठिकाणी रस्ता खचला होता आणि त्यासोबत सुधीरपण खचत गेला...

त्याची पत्नी वर्षा, त्याचं लेकरू यांच्या विचाराने काळीज अक्षरशः पिळवटून गेलं होतं. काही करून घरी पोचण्यासाठी तो

धडपड करीत होता. पण निसर्ग ठिकठिकाणी त्याला हतबल करू पाहत होता...

कसेतरी त्याने गाव गाठलेच! त्या निबिड रात्री चंद्रप्रकाशात त्याला समोर काहीच उरलेलं दिसलं नाही. ना त्याचं गाव, ना घर, ना बायको, ना त्याच्या काळजाचा तुकडा...

अवसान गळल्याने त्याच चिखलात गुडघे टेकवत तो मटकन खाली बसला...

आणि आकाशाकडे पाहत त्याने मोठ्याने एकच हंबरडा फोडला...

## प्रकरण ८

## देवा तू सांग ना, कुठे गेलास हरवुनी

### दि. २२ जुलै २०२१ स्थळ: महाड शहर

"आजी, दुसऱ्या मजल्यावर पण पाणी आलंय" पार्थ

वडके आजीसुद्धा आता घाबरल्या होत्या. आजवरच्या इतिहासातील सर्वात मोठा पूर त्या उघडया डोळ्यांनी बघत होत्या. दरवर्षी पुरात तळमजले बुडत होते. जास्तीत जास्त पहिल्या मजल्याला पाणी टेकायचं. मात्र या वर्षीच्या पावसाने कहरच केला होता. कालपासून न थांबता कोसळणारा पाऊस अख्ख्या शहराला गिळत होता. अब्दुल आणि पारेखकाका दुकान बंद करून आपापल्या घराच्या टेरेसवर आले असले तरी इमारतींचे दोन मजले पाण्याखाली बुडालेले पाहून त्यांचा जीव अर्धा झाला होता. वर टेरेसवरून ते हा सगळा जीवघेणा खेळ पाहत होते. बाजूच्याच बिल्डिंगमधले जोशीकाका वरून पुराचे पाणी बघत असताना पाय घसरून थेट खाली पाण्यात पडले. काही वेळाने त्यांचं शव मिळालं. कुणा कुणाच्या किंकाळ्या ऐकाव्यात. शहरातल्या सगळ्याच भागात पाणी साचलं होतं. मदतीला पाठवलेली एनडीआरएफची टीम पावसामुळे मुंबई गोवा महामार्गावरच

अडकून पडली. वाचलेल्या लोकांना पोटापाण्याचा प्रश्न होता. नेव्ही चे हेलिकॉप्टर कधी येतील याची वाट पाहत रात्र झाली. करे आळीतून फक्त किंचाळण्याचे आवाज येत होते. कुणीतरी जीव वाचवण्यासाठी आक्रोश करत होते. मात्र नाईलाजास्तव खिडकीतून दूरवर कानोसा घेण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. लाईट, नेटवर्क नसताना प्रत्येक क्षण जणू दिवसासारखा भासत होता. पाणी वाढतच चाललं होतं. प्रवास कॉलनीत दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या मोरे दादानी मात्र खरे शौर्य दाखवले. आजूबाजूला मोठमोठे बांबू शोधून त्यांनी रस्त्यावर आडवे लावले. त्यामुळे वाहून जाणाऱ्या बऱ्याच गाड्या आणि वस्तू एकाच ठिकाणी थांबल्या. एवढ्यात कुठूनतरी वाचवा वाचवा असा आवाज ऐकू आला. बसके घर असलेलं तांबे कुटुंब घराच्या माळयावर थांबलं होतं पण पुराचं पाणी आता माळ्यालाही टेकल होतं. मोरे दादाने क्षणभरही विचार न करता त्यांच्या घरचा वरचा पत्रा फोडला आणि त्या सगळयांना सुखरूप बाहेर काढलं. त्यानंतर त्यांना आपल्या घरी आणलं. खरंतर संकटाच्या वेळीच माणुसकीचे खरे दर्शन होते. अशा वेळी जाती धर्म, गरीब श्रीमंत, लहान मोठे अशा सगळ्या भिंती गळून पडतात. पाऊस थांबला असला तरी पुराचं पाणी काही ओसरत नव्हतं...

डुलक्या घेत घेत पार्थ झोपी गेला.

## प्रकरण ९

## जो दिखता है, वो बिकता है

### दि.२३ जुलै २०२१ स्थळ: मुंबई

वाफाळलेला कॉफीचा मग टेबलवर ठेवून उमा गहन विचारात गुंतली होती. गेली तीन वर्षे तिचं प्रमोशन रखडलं होतं. आणि हातात चांगली स्टोरीसुद्धा येत नव्हती. मगातली कॉफी गार झाली होती...

"उमा, एक नवीन बातमी आहे. काल रात्री कोकणात एक ठिकाणी दरड कोसळून संपूर्ण गाव गडप झालंय. सरांनी तुला आणि राकेशला रिपोर्टसाठी अपॉइंट केलंय."

टेबलावरली कॉफी तशीच ठेवत उमा लगेच कॅमेरामनसोबत निघाली. मुंबई सोडली. चार तास उलटले आणि दुपारी ती त्या गावाजवळ पोचली. खरंतर तिथपर्यंत पोहोचताना तिला प्रचंड मनस्ताप झाला होता. अनेक ठिकाणी रस्ते खचले होते, पूल तुटले होते. त्यासाठी नेत्यांना दोष द्यावा की त्यांना निवडून देणाऱ्या लोकांना की निसर्गाला हेच तिला कळत नव्हतं. घटनास्थळी

जाऊन तिने तात्काळ न्यूज रिपोर्टिंगला सुरुवात केली. मृतांचे नातेवाईक जमल्याने आसमंतात रडण्याचा आवाज  घुमत होता. पोलीस आणि रेस्क्यू टीम आपापलं काम करत होते. अनेक लोकांनी बघायला गर्दी केली. उमाला अनेक न्यूज चॅनल येताना दिसले. त्यामुळे सरशी मिळवण्यासाठी तिने मोठ्या आवेशात घटना कॅमेऱ्यापूढे मांडायला सुरुवात केली... आणि गर्दी जमू लागली...

बोलता बोलता तिचं लक्ष एका ठिकाणी गेलं. ती सायली होती... हो... तिला स्पष्ट आठवतंय ती सायलीच होती. दोघीही लहानपणी एकाच शाळेत होत्या. उमा नेहमी पहील्या बेंचवर बसायची तर सायली शेवटच्या बेंचवर बसून काहीतरी वाचत बसलेली असायची. आज जेमतेम बारा वर्षांनी ती उमाला दिसली. पण जरा वेगळया रुपात. घटनास्थळावरून काही अंतरावर असलेल्या दरीत जिथं प्रेतं काढण्याचं काम चालू होतं, सायली स्वतः निर्भीडपणे तिथं जाऊन एकेक गोष्ट बारकाईने निरीक्षण करत होती. डेडबॉडी मिळालेल्या नातेवाईकांना ती वेळोवेळी आधार देत होती. खरंतर ती आघाडीच्या एका वर्तमानपत्रात कामाला होती पण आज प्रत्यक्ष तिला काम करताना पाहून उमाला नवल वाटले. ती भानावर आली ती फोन वाजल्यामुळे-

"अभिनंदन उमा! आपला न्यूज चॅनेलला सर्वांत जास्त टीआरपी मिळालाय. किप इट अप! थांबू नको!"

या आनंदाच्या बातमीने उमाला हुरूप आला. पुन्हा तिने लोकांचे प्रश्न टीव्हीवर मांडायला घेतले. एकीकडे लोकांचा हंबरडा तर दुसरीकडे तिच्या ओरडण्याचा आवाज! बघ्यांची गर्दी तिकडेच जमत होती...

शेवटी तिने ब्रेक घ्यायचं ठरवलं...

"कॅमेरामन राकेशसह, उमा राणे, एबीसी माझा"

## प्रकरण १०

## अफवांचा पाऊस

### दि. २३ जुलै २०२१ स्थळ: बिरवाडी

राहुल गेले दोन दिवस जे घडून गेलं त्याच विचारात गुंतला होता. पाऊस आता थांबला असला तरी त्यापुढे बिकट परिस्थिती होती. खरंतर खरा संघर्ष पूर किंवा चक्रीवादळ संपल्यावरचा असतो. मात्र त्याची कोणतीही बातमी आपल्यापर्यंत पोचत नाही. तीन दिवस झाले, लाईट पाणी नव्हतं. काल रात्री जरासं नेटवर्क आलं तेव्हा आख्ख्या गावाला दरड कोसळल्याची बातमी कळली आणि सगळ्यांनी शोक व्यक्त केला. काहीजणांच्या नातेवाईकांनी तिकडे धाव घेतली. मुंबई पुण्याहून अनेक लोक गावाला आपल्या नातेवाईकांना फोन लावत होते मात्र कुणाचाच फोन लागत नव्हता. खरंतर तिकडची लोकं टीव्हीवर सगळं पाहत होती. पण इकडे पुरात अडकलेल्या लोकांना आजूबाजूला काय घडतंय कळायला मार्गच नव्हता. घरात काही मोजक्या वस्तु शिल्लक होत्या. दुकानांतही काही उरलं नव्हतं. कांबळे काका जड अंतकरणाने दुकानात शिरले. हे सुद्धा कमी होतं म्हणून गावाला लागून असलेल्या

एमआयडीसीत काल रात्री दोन कंपन्यामध्ये स्फोट झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. असं घटनांचं सत्र सुरूच होतं.

राहुल खिडकीत बसून आठवत होता. इतक्यात लोकांच्या ओरडण्याचा आवाज कानी आला. राहुल दार उघडून रस्त्यावर आला. तर बाहेर रस्त्यावर अनेक लोक सैरावैरा धावत होते. कुणी बाईकवर, कुणी पायी, कुणी हातात बॅग घेऊन तर कुणी अनवाणी...एकाला विचारलं असताना त्याने सांगितलं कंपनीतून गॅस लीक झाला आहे आणि गाव खाली करायला सांगितलय...

काही लोक मात्र घरातच होते. काही वेळाने ग्रामपंचायतीची गाडी आली आणि दवंडी पिटवली गेली... "ही अफवा असून कुणीही घराबाहेर पडू नका"

सगळयांच्या जीवात जीव आला. आणि या अफवेवर विरजण पडलं. दुसऱ्या दिवशी पुन्हा तीच अफवा पसरली आणि खरोखर आख्खा गाव चालत विरुद्ध दिशेने निघाला. पण ती सुद्धा अफवा निघाल्याने सगळे मागे फिरले. एव्हाना काही दयाळू लोकांकडून मदत वाटायला सुरुवात झाली होती. पिण्याचं पाणी, बिस्कीट वाटलं गेलं. अधूनमधून रस्त्यावर येणाऱ्या गाड्यातला माल एकाएकी गायब होत असे. कालच्या पुरात अनेक विजेचे खांब कोसळले होते आणि काही डीपी जळाले. त्यामुळे अजून

आठवडाभर तरी लाईट येणार नाही अशी शक्यता वर्तवली जात होती. वापरायचं सोडा पिण्याचं पाणी भेटणं मुश्किल झालं होतं. त्यात एखादा पाण्याचा टँकर आला तर ही अशी लोकांची गर्दी होत असे... दुसऱ्या दिवशी राहुलने बाजारातून फेरफटका मारला. सगळ्या दुकानांच्या बाहेर रस्त्यावर भलामोठा कचऱ्याचा ढीग होता. तर काहीजण आत दुकानात बसून कुठून सुरुवात करावी ह्याच प्रश्नात अडकले होते. कोरोनाने मोडलेल्या कण्यावर पुन्हा असा आघात होईल कोणी विचारही केला नव्हता...

## प्रकरण ११

## कुणी मदत देतं का मदत?

### दि.२४ जुलै २०२१ स्थळ: आदिवासीवाडी, काळीज

तशी रोजच्याच जगण्याची दैना झाली होती. म्हणून त्या सकाळी 'ती' पुन्हा बाहेर पडली दुसऱ्या गावाच्या दिशेने. सगळीकडे चिखल पसरला होता. त्या गावात अजून पाणी आलं नसल्याने सगळ्या बायकांनी विहिरींवर कपडे धुवायला गर्दी केली होती. समोर बऱ्याच गाड्या येताना दिसत होत्या. मात्र त्यातील वस्तू ते ठराविक लोकांनाच देत होते. पोटात भुकेची तळमळ तर होतीच पण अंगावरचं राहिलेलं एकुलतं एक लुगडं पण जीर्ण झालं होतं. ती त्या बायकांकडे भीक मागत होती. मला कपडे द्या, आमचं सगळं वाहून गेलंय मात्र तिचं ऐकणारं कुणी नव्हतं. जणू 'ती' त्यांच्या दुनियेत नव्हतीच. पण तिचं दुःखही फार काळ टिकलं नाही. समोरून ग्रामपंचायतीची काही माणसं आली. त्यांनी सांगितलं की गावात लय कचरा झालाय. तुमच्या सगळ्या लोकांना बोलवा. येवढ्या येवढ्या जागेचे येवढे पैशे. चला काही का होईना दमडी तर मिळेल म्हणत ती आणि तिच्या साथीदारांनी

गाव साफ करायला घेतलं. तिचा आजचा पोटापाण्याचा प्रश्न सुटला होता.

समोर मदत वाटायला आलेल्या गाड्यांपुढे मोठमोठी लोकं कशी निर्लज्जपणे सारखी सारखी जाऊन आपली घरं भरून ठेवतात हे ती आपल्या डोळ्याने बघत होती. खरंतर माणसाच्या या वृत्तीचा तिला खूप राग येत असे. मात्र 'ती' कुणालाच सांगू शकत नव्हती.

## प्रकरण १२

## एकमेका साहाय्य करू

### दि. ३० जुलै २०२१ स्थळ: महाड शहर

महापूर येऊन आठवडा झाला. बावीस केवीच्या विजेच्या मेन लाईनचा टॉवर नादुरुस्त झाल्याने आठवडाभर लाईट नव्हती. सात दिवसांनी कर्मचाऱ्यांना यश आले आणि शहरात काही तास वीज उपलब्ध झाली. परंतु अजून बरेच काम बाकी होते. एक आठवडा झाला तरी शहराचे चित्र पालटले नव्हते. जिथे कधी काळी स्वछ सुंदर शहर होते तिथे आता फक्त दुर्गंधी, कचरा, चिखल साचला होता. पारेखकाका दुकानात आले. सगळेच लोक आधी आपले घर सावरण्यात व्यस्त होते. अब्दुलने दुकानातील खराब झालेली फळं फेकून दिली. याच काळात शहर स्वछ करायला महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातुन अनेक सामाजिक संस्था येत होत्या. हे पाहून त्याला आनंद झाला. आतापर्यंत विक्रमी कचरा गोळा होत होता. वरून वडके आजी पाहत होत्या. शहरातले रस्ते अजून लालबुंद होते. मदतीसाठी रोज गाड्या येत होत्या. कदाचित शहर पूर्ववत व्हायला अजून महिना लागणार होता. पण शहरापासून

दूर असणाऱ्या गावात तर सोयीसुविधांचा बोजवारा उडाला होता आणि इतक्यात तिकडे लक्ष देणारं कोणी नव्हतं. पूरग्रस्त लोकांच्या आरोग्यासाठी शिबीर भरवलं गेलं. काही भागात लेप्टोसारखे रुग्ण वाढत होते. एकूणच काय तर आयुष्यात पहिल्यांदाच अनुभवलेला इतका वाईट पूर आयुष्याची घडी विस्कटून गेला होता. आणि ती पुन्हा बसवायला दीर्घ काळ लागणार होता. म्हणून तर काही लोकांनी परगावी असलेल्या आपल्या नातेवाईकांकडे धाव घेतली. ऐंशी वर्षाच्या वडके आजी त्या दिवसाला आठवतात आणि अंगावर काटा येतो. तो भयंकर पाऊस... त्या किंचाळया... जी जगण्याची धडपड... तो समोर पाहिलेला मृत्यू...

## प्रकरण १३

## दरड कोसळल्यावर

### दि. २२ ऑगस्ट २०२१ स्थळ: कुठेतरी

त्या दुर्दैवी घटनेला आज एक महिना पूर्ण झाला. महापूर येतो अन जातो मात्र त्यानंतर असंख्य प्रश्न आ वासून उभे राहतात. या धक्क्यातून अजूनही ते सावरले नाहीत. मनात सदानकदा असंख्य विचारांचा महापूर येत राहतो आणि आपण कशासाठी जिवंत आहोत या भावना सारख्या उफाळून येतात...

न्यूज अँकर उमा मुंबईच्या चॅनेलच्या ऑफिसला परतली. तिला त्या बातमीच्या उत्तम कामगिरीसाठी प्रोमोशन मिळालं. ती खुश होती. सायलीला मात्र तिच्या कामासाठी कोणतंच बक्षीस वा अभिनंदन मिळालं नाही. पण तरी देखील ती खुश होती. कारण आपण चांगलं काम केल्याचं समाधान तिच्या चेहऱ्यावर होतं...

पारेखकाका दुकानाची घडी हळूहळू बसवतायत. ओल्या कपड्यांना सुकवून त्यांचा सेल लावला. पुरामुळे झालेल्या अपरिमित हानीमुळे त्यांच्या डोक्यावर कर्जाचं टेंशन होतं. अब्दुलने

इतर सहकाऱ्यांसारखं स्वतःला कामात गुंतवून घेतलं. शासनाने पूरग्रस्तांना मदत 'जाहीर' केली. हे ऐकून बरे वाटले. पार्थ आणि त्याची आजी या घटनेनंतर तिच्या लेकीकडे काही दिवस राहायला गेले, ते अजून आलेच नाहीत...

एमपीएससीची तयारी करणाऱ्या राहुलने पुण्याला जायचं ठरवलं. गावात सारख्या घडणाऱ्या या घटनांमुळे अभ्यासात व्यत्यय येऊ लागल्याने त्याने हा निर्णय घेतला. पूर आलेल्या दिवशी विस्कळीत झालेली वीज, पाणी आणि मोबाईल नेटवर्क अगदी चार दिवसापूर्वीच पूर्ववत झाले. कांबळे काका आपल्या रिकाम्या दुकानात डोक्याला हात लावून बसले होते...

'ती' ? तिची वणवण अजून सुरूच होती. आख्ख्या महिन्याचा पाऊस एकदाच पडावा तसा कोसळला आणि त्यानंतर पुन्हा चटके देणारे ऊन पडले. त्यात तिची रोजची पोट भरण्यासाठी धडपड सुरू होती... आणि सुरूच राहील...

दुर्घटनेत वाचलेल्या ईशानी आणि शुभम यांच्या आईने त्यांना मामाकडे न्यायचं ठरवलं. गावातल्या मृत नव्वदपैकी तीस जणांचे मृतदेह अद्यापही मिळाले नाहीत. शेवटला मिळालेल्या देहांचे छिन्नविच्छिन्न तुकडे, तुटलेले अवयव पाहून गावकरी भिऊ लागले. त्यांनी शोधकार्य थांबवायला सांगितले. आणि त्या

मातीच्या ढिगाऱ्यावरच न सापडलेल्या सर्वांचे अंतिम संस्कार करण्यात आले. त्याच्या आजूबाजूला शेती आहे. मात्र संध्याकाळ झाल्यावर तिकडे फिरकायला सुद्धा लोक घाबरत आहेत...

सुधीरची बायको आणि बाळ गेल्याने तो पूर्णपणे तुटला. मुंबईला असलेली त्याची आई व इतर नातेवाईक गावी आले. इतके दिवस तो धड झोपला नव्हता की जेवला नव्हता. रात्रभर तो भिरभिर फिरत आपलं बाळ व बायको इथंच आहेत असं समजून स्वतःशीच बडबडत होता. जखमी झालेल्या काही नातेवाईकांना मुंबईला रुग्णालयात नेले होते मात्र आठवडाभर त्यांची मृत्यूशी झुंज संपली आणि ते निर्वतले. सुधीरच्या आईने त्याला कसेतरी आपल्यासोबत मुंबईला नेले...

रणजित... रणजित लडाखला आर्मी बेस कॅम्पमध्ये परतला आहे. त्याच्या अंतःकरणात धीर खचलेला, सर्वस्व गमावलेला माणूस आणि सैन्यातला वीर जवान या दोघांचं युद्ध सुरू आहे. त्याच्या डोळ्यांतून अजून एक अश्रूसुद्धा आला नाही. त्याला अजूनही आठवतंय तिथं पोचल्यावर सगळे हंबरडा फोडत होते, आक्रोश करत होते. मात्र तो तसाच शांत निर्विकारपणे त्या मातीकडे पाहत होता... आज महिन्याभराने तो देशसेवेत पुन्हा रुजू झाला. तिकडे त्याने एक कुटुंब गमावलं होतं पण इथे त्याच्यासाठी

एक मोठ्ठं कुटुंब होतं ज्याचं रक्षण तो सीमेवर करत होता. दूरवर गस्त घालताना मात्र त्याला फोन करून काळजी घे म्हणून सांगणारं आता कोणी उरलं नव्हतं. मोबाईलचं वालपेपर बघता बघता त्याला पुन्हा त्याच गोष्टी आठवू लागल्या... त्याने ते वालपेपर बदललं... एक दीर्घ उसासा टाकला आणि कॅम्पमधून बाहेर डोकावून पाहिलं... हिमालयाचा कडा अजूनही तसाच चांदीसारखा चकाकत होता... पण यावेळी मात्र त्याला भव्य हिमालयाकडे पाहून बळ मिळालं. त्याची छाती अभिमानाने भरून आली...

त्याच क्षणी भारतमातेच्या डोळ्यांत पाणी आलं...

समाप्त.




अभिप्राय कळवा

omkar.zanje1@gmail.com

7770099295

इंस्टाग्राम: kshitij_antariche, __omkar_zanje__

## ओंकार झांजे यांची प्रकाशित पुस्तके

## कव्हरवर क्लिक करा फ़क्त एकदा













